सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**कुंभमेळा आयुक्त यांचे कार्यालय, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण**
**जुने जिल्हा परिषद भवन, त्र्यंबक नाका, नाशिक - 422001**
**दुरध्वनी क्र. 0253-2977374 Email- mahakumbhanashik@gmail.com**

जा.क्र.नात्र्यंकुंप्रा/ऑगस्ट-इतिवृत्त/330/2026 दि.स्वाक्षरीखाली नमूद

प्रति,

1 मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
2 मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
3 मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.
4 मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.
5 मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
6 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
7 मा.सह आयुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
8 मा.विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.
9 मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक.
10 मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
11 मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.
12 मा.अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.
13 मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.
14 मा.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळ नाशिक
15 मा.सह संचालक, लेखा व कोषागारे, नाशिक
16 मा.सह संचालक, नगररचना, नाशिक विभाग.
17 मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.
18 मा.जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक.
19 मा.जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.
20 मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक.
21 मा.सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.
22 मा.मुख्यधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद
23 मा.रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी.
24 मा.कार्यासन अधिकारी, ना.त्र्यं.कुं.मे.प्रा.कार्यालय, नाशिक
25 व इतर सर्व संबंधीत यंत्रणा

**विषय : नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे दि.25/08/2026 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त..**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक दि.25 ऑगस्ट 2026 रोजी मा.अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली आहे.

सदर बैठकीचे इतिवृत्त या सोबत पाठविण्यात येत असून इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

**आपला विश्वासु**

Digitally signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 07-09-2026 17:07:24

**( योगेंद्र चौधरी )**
**उपायुक्त (नियोजन)**
**नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.**
**नाशिक**

**प्रत :- माहितीस्तव सविनय सादर..**

१) मा.उपाध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा मा.विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र.

२) मा.उपाध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा मा.जिल्हाधिकारी, नाशिक

# नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाच्या दि. २५/०८/२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

दि. २५/०८/२०२६ रोजी रोजी मा.डॉ. प्रवीण गेडाम, अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक घेण्यात आली. बैठकीतील उपस्थितांची यादी सोबत संलग्न आहे.

कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले. बैठकीच्या सुरुवातीला प्राधिकरणाच्या दि. २१/०७/२०२६ रोजी झालेल्या मागील बैठकीच्या इतिवृत्ताबाबत प्राधिकरणाचे सदस्य सह संचालक, लेखा व कोषागारे, नाशिक यांनी सांगीतले की, मागच्या बैठकीच्या इतिवृत्तातील विषय क्र. ५- कुंभमेळा गीत (Anthem Song) संगीतबद्ध करण्याच्या प्रस्तावावरील चर्चेदरम्यान प्राधिकरणाच्या अधिनियमानुसार विशिष्ट परीस्थितीमध्ये एकल खरेदी करणे शक्य असल्याचे परंतु ती खरेदी दि. ०१.१२.२०१६ च्या महाराष्ट्र शासनाच्या खरेदी धोरणाच्या अधिन राहूनच करता येईल असे मत व्यक्त केले असल्याचे सांगीतले. सदस्यांच्या मताची नोंद घेतल्यावर इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

मा अध्यक्ष महोदयांनी बैठकीला सुरुवात करताना खालीलप्रमाणे सर्वसाधारण सुचना केल्या.

- नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणास प्रस्तावित केलेल्या कामाशी संबंधित विषयाचे तज्ञ/ तांत्रिक ज्ञान/ प्रशासकीय ज्ञान असणा-या संबंधित विभागाच्या अधिका-यांनी मत / सल्ला देणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल, गर्दी व्यवस्थापनासारख्या महत्वाच्या बाबीकरीता पोलिस विभागाचे तांत्रिक/ प्रशासकीय- मत/ सल्ला महत्वपुर्ण राहील. भुसंपादनविषयक बाबींकरीता जिल्हाधिकारी यांचे तांत्रिक/ प्रशासकीय- मत/ सल्ला महत्वाचा असेल. जलसंपदाविषयक बाबींकरीता जलसंपदा विभागाच्या अभियंत्यांचे तांत्रिक मत, बांधकामविषयक बाबींकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांचे मत महत्वपुर्ण असणार आहे. तसेच वित्तीय बाबींकरीता सह संचालक, लेखा व कोषागार, नाशिक यांचे मत महत्वाचे असेल. तरी संबंधित तज्ञ अधिका-यांनी मते मांडावित आणि ती विचारात घेण्यात यावीत.
- प्रस्तावांवर चर्चा करतांना शिखर समितीची मान्यता नसणाऱ्या मात्र यापुर्वी मंजुर केलेल्या व या बैठकीत प्रस्तावित कामांना शासनाची मान्यता लवकर मिळवून घेणे गरजेचे आहे. कुंभमेळा योजनेव्यतिरिक्तची मंजुर कामे तातडीने मंत्री समितीस सादर करुन आवश्यक मान्यता मिळवून शिखर समितीकडून कार्योत्तर मान्यता करुन घेणे आवश्यक आहे.
- प्रस्ताव सादर करताना सदरचे काम कुंभमेळा सुरु होण्यापुर्वी (मार्च २०२७ अखेरपुर्वी) पुर्ण होण्याची खात्री असल्यासच यंत्रणांनी कामे नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या निधीतून प्रस्तावित करणे योग्य होईल. यापूर्वी वारंवार नमूद केल्याप्रमाणे आणि शासन स्तरावरून आलेल्या निर्देशाप्रमाणे काम प्रस्तावित केले व प्राधिकरणाने मान्यता दिली परंतु काम वेळेत पुर्ण झाले नाही तर त्याची सर्वस्वी जबाबदारी काम प्रस्तावित करणा-या अधिका-याची राहील याची नोंद घ्यावी. काम विहित वेळेत पुर्ण करण्याची अट प्रशासकीय मान्यता आदेशात नमूद करावी.
- कामे प्रस्तावित करताना वेगवेगळ्या विभागांकडून एकाच प्रकारच्या कामांची मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी अशा प्रस्तावांच्या खरेदी प्रक्रीया राबवितांना एकत्रितपणे राबविणे शक्य, शासनाच्या निधीची बचत करणारे व व्यवहार्य असल्यास त्या पर्यायाचा वापर करण्यात यावा.
- प्रस्तावांची आवश्यकता व व्यवहार्यता यांबाबत यंत्रणांनी त्यांचे स्तरावर आढावा घेऊन खरेदी प्रक्रीया राबविणे योग्य होईल. उदाहरणादाखल, रुग्णालयांची दुरूस्ती करणे हे ज्या त्या विभागाची स्वतंत्र बाब असू शकते. परंतु औषधे, वैद्यकीय साधन सामुग्री, रुग्णवाहिका इत्यादी करीता, महानगरपालिका आरोग्य विभाग, जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी वेगवेगळी खरेदी प्रक्रीया न राबविता एकत्रित निविदा प्रक्रीया राबविल्यास त्यातुन निधीची बचत होईल व प्रक्रीयांची द्विरुक्ती टाळणे शक्य होईल व साहित्याची गुणवत्ता राखणे शक्य होईल.
- तसेच काही प्रस्तावांच्या बाबतीत वर्गीकरण आवश्यक असताना एकत्रिकरण झाल्याचेही नमूद केले. विशिष्ट प्रकारच्या पुरवठादाराला सर्व प्रकारच्या बाबी पुरविणे शक्य होत नाही. त्यामुळे काही मध्यस्थीने

NTKMA
बैठक- इतिवृत्त

पुरवठा करणारे पुरवठादार अशा घटकांमधून गैरफायदा घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे व्यवहार्य आणि नियम तथा मार्गदर्शक तत्वांनुसार दृष्टीकोण ठेवून कामांचे आवश्यकतेनुसार वर्गीकरण करुनच खरेदी प्रक्रीयेचे काम करावे.

त्यानंतर अजेंड्यावरील विषयांवर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले:

---

**भाग-१: शिखर समितीने मान्यता दिलेले विषय (सार्वजनिक आरोग्य व पोलीस विभागाचे विषय)**

❖ **आरोग्य विभागाचे विषय-**

- सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रस्तावांचे सविस्तर सादरीकरण उपसंचालक, आरोग्य विभाग यांचेकडून करण्यात आले.

**विषय क्र. १:- सार्वजनिक आरोग्य विभाग, नाशिक महानगरपालिका अंतर्गत विविध कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

| अ. क्र | प्रस्तावाचे नाव | प्रस्तावाचा खर्च | बैठकीतील चर्चेचा सविस्तर तपशिल / निर्णय |
|---|---|---|---|
| a | तात्पुरत्या स्वरुपात पोर्टा कॅबिन चिकित्सालय उभारणे | रु. १०.८६ कोटी | कुंभमेळा कालावधीतील गर्दी व्यवस्थापनासाठी शहरात विविध ठिकाणी (साधुग्राम, घाट परिसर, पार्किंग इ.) पोर्टा कॅबिन हॉस्पिटल्स आणि आयसीयू उभारण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. पोर्टा केबिन संकल्पना काय आहे याची माहिती उपसंचालक, आरोग्य यांनी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी दिली. तसेच त्यांची एकूण संख्या, प्रकार, त्यांचा आकार, उभारण्यात येणा-या जागांची संख्या, त्या ठिकाणी उपलब्ध आवश्यक सोयी सुविधांची खात्री केली आहे, असे उपसंचालक, आरोग्य यांनी सांगितले. त्याचप्रमाणे कुंभ कालावधीनंतर त्यांच्या वापराबाबत करण्यात आलेली तजवीज इत्यादीची सविस्तर माहिती देण्यात आली. यावर कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, सदरच्या पोर्टा केबिनचा वापर नंतर प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी करता येऊ शकेल. Tent (तंबू) बद्दल विचारणा केली असता, तंबू पोर्टा केबिन पेक्षा महाग / जास्त खर्चिक आहेत, असे उपसंचालक यांनी सांगितले. कुंभमेळयानंतर या पोर्टा केबिनच्या वापराबाबत उपसंचालक, आरोग्य विभाग, जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, नाशिक महानगरपालिका वैद्यकीय विभाग यांनी एकत्रित नियोजन करावे असेही नमूद केले. बैठकीच्या सुरुवातीस दिलेल्या सर्वसाधारण सुचनांप्रमाणे आवश्यक पुढील कार्यवाही करण्याच्या अटीवर प्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली. |

| अ. क्र | प्रस्तावाचे नाव | प्रस्तावाचा खर्च | बैठकीतील चर्चेचा सविस्तर तपशिल / निर्णय |
|---|---|---|---|
| b | सामूहिक आपत्ती अनुषंगाने वैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण आणि क्षमता बांधणी (OT & ICU Upgradation) | रु. १४.९१ कोटी | मनपाच्या ४ रुग्णालयांमध्ये मॉड्युलर ऑपरेशन थिएटर व आयसीयू स्थापन करण्याच्या 'Turn Key' प्रकल्पास मंजुरी देण्यात आली . उपलब्ध व आवश्यक सोयी सुविधांची खात्री करुन, तसेच आपत्तींच्या संभाव्य प्रकारांनुसार - आगीमुळे अपघात झाल्यास Burn Unit, चेंगराचेंगरी झाल्यास-अतिदक्षताविषयक तजवीज, पूर, जलदुर्घटना, बुडालेल्या व्यक्तींकरीता आवश्यक सोयी सुविधा, इतर आवश्यक संभाव्य आपत्तींचा विचार करुन सदरचे क्षमता बांधणी व सक्षमीकरण करण्यात यावे असे मा. अध्यक्ष महोदयांनी सांगीतले. याबाबत आवश्यक त्या सुचना संबंधितांना देण्यात आल्याची सविस्तर माहिती कुंभमेळा आयुक्त यांनी दिली. बैठकीच्या सुरुवातीस दिलेल्या सर्वसाधारण सुचनांप्रमाणे आवश्यक पुढील कार्यवाही करण्याच्या अटीवर प्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली. |
| c | आपत्कालीन स्थलांतर प्रणाली (रुग्णवाहिका उपलब्धता) | रु. ०९.२२ कोटी | मनपासाठी २५ नवीन रुग्णवाहिका (२० BLS व ५ ALS) खरेदी करणे व उर्वरित ७३ रुग्णवाहिका (६१ BLS व १२ ALS) भाडेतत्वावर घेणे-प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन तिन्ही विभागांनी आवश्यकतेनुसार प्रस्तावाचे एकत्रीकरण करुन खरेदी प्रक्रीया / भाडे तत्वावरील घेणेची कार्यवाही करण्याच्या अटीवर प्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली. |
| d | औषधे खरेदी करणे (Medicine) | रु. ०९.७८ कोटी | संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आणि लॅब टेस्टिंग सुविधेसाठी आवश्यक निधीच्या औषध खरेदीच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन तिन्ही विभागांनी आवश्यकतेनुसार प्रस्तावाचे एकत्रीकरण करुन खरेदी प्रक्रीया कार्यवाही करण्याच्या अटीवर प्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली. |
| e | वैद्यकीय उपकरणे व साहित्य सामुग्री | रु. ०८.५७ कोटी | तात्पुरत्या व स्थायी रुग्णालयांसाठी आवश्यक उपकरणे (Multipara Monitor, ECG Machine इ.) व फर्निचर खरेदीसाठी खरेदीच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन तिन्ही विभागांनी आवश्यकतेनुसार प्रस्तावाचे एकत्रीकरण करुन खरेदी प्रक्रीया कार्यवाही करण्याच्या अटीवर प्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली. |
| f | भीष्म किट (BHISHMA Cubes) खरेदी | रु. ०७.९९ कोटी | Mass Casualty व्यवस्थापनासाठी पोर्टेबल मोबाईल रुग्णालय खरेदी करण्याचा प्रस्ताव यापुर्वीही सादर करण्यात आला असल्याची व त्यावर चर्चा झाल्याची बाब मा. अध्यक्ष महोदयांनी निदर्शनास आणून दिली. यावर कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, सदरचा प्रस्ताव हा अवर सचिव आपत्ती व्यवस्थापन यांचेकडुन प्राप्त पत्र क्र. १५३८९८१ दि.२३.०७.२०२६ नुसार केंद्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत दिल्या जाणा-या निधीतून राज्यस्तरावरुन खरेदी करुन विभागास उपलब्ध करुन दिल्या जाणा-या खालीलप्रमाणे 3 प्रकारच्या साहित्यात समाविष्ट आहे. अ) Integrated Flood Management System ब) Specialised Fire-fighting with specialised equipment and tethered fire-fighting drone क) Modular Field Hospital with Triage and Trauma Response Unit सदरचा प्रस्ताव बैठकीत अवलोकनार्थ सादर केल्याचे नमूद केले. |

| अ. क्र | प्रस्तावाचे नाव | प्रस्तावाचा खर्च | बैठकीतील चर्चेचा सविस्तर तपशिल / निर्णय |
|---|---|---|---|
| g | कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करणे | रु. २०.२४ कोटी (शिखर समिती मान्यता रु. १३.९७ कोटी) | कुंभमेळयाच्या ४ महिन्यांच्या कालावधीसाठी तज्ज्ञ डॉक्टर्स, नर्स व पॅरामेडिकल स्टाफ कंत्राटी पद्धतीने भरती करण्याच्या खर्चाच्या प्रस्तावावर खालीलप्रमाणे सविस्तर चर्चा झाली. मा. अध्यक्ष महोदयांनी तज्ञ डॉक्टर्स, नर्स व पॅरामेडीकल स्टाफ व इतर मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीने भरताना ते त्रयस्थ संस्था/यंत्रणेमार्फत भरण्यात येणार आहेत की थेट मुलाखतीद्वारे त्यांची नियुक्ती केली जाणार आहे ? अशी विचारणा केली. यावर सविस्तर चर्चा करण्यात आली व पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.<br>➢ त्रयस्थ यंत्रणांकडून उपलब्ध होणारे मनुष्यबळाच्या कामांचा योग्य दर्जा राखला जाण्याची हमी नसल्यामुळे तज्ञ डॉक्टर्स, नर्स व पॅरामेडीकल स्टाफ यांची नियुक्ती करतेवेळी त्यांचे तज्ञ डॉक्टर्सकडून मुलाखत घेऊनच नियुक्ती अंतिम करण्यात यावी.<br>➢ आवश्यकता असल्यास त्यांचे रोस्टर्स तयार करण्यात यावेत त्याकरीता विभागीय कार्यालयाची मदत/ मान्यता आवश्यक असल्यास दिली जाईल असेही मा. अध्यक्ष महोदयांनी सांगीतले.<br>➢ स्वेच्छेने सेवा देऊ इच्छिणा-या डॉक्टर्सच्या बाबतीतही आवश्यकतेनुसार त्यांचे स्वतंत्र नोंदणी, दस्तावेजीकरण करणे आवश्यक आहे जेणेकरुन आवश्यक्तेनुसार जबाबदारी निश्चित करणे शक्य होईल.<br>➢ तसेच नियुक्त डॉक्टर्स नेमणूकीच्या ठिकाणी उपलब्ध राहतील याकरीता जिआयएस फेन्सींगसारख्या प्रणालीचा वापर करणे संयुक्तीक होईल असेही मत मांडण्यात आले इतर मनुष्यबळ त्रयस्थ संस्था/यंत्रणेमार्फत भरण्यास हरकत नसल्याचे सांगीतले.<br>उपरोक्त बाबींची खातरजमा करुनच सर्व आरोग्यविषयक संस्थांनी काम करावे या अटीवर मान्यता प्रदान करण्यात आली. |
| h | डास प्रतिबंधात्मक उपाययोजना (मलेरिया विभाग) | रु. ०४.७७ कोटी | पंचवटी व साधुग्राम परिसरात धूर फवारणी, कीटकनाशक खरेदी व जनजागृती मोहिमेसाठी खर्चाच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावर यंत्रणेने माहिती दिली की, यामध्ये केवळ डास निर्मुलनाचीच कार्यवाही होणार असली तरी याद्वारे साथींच्या रोगांच्या प्रसारास आळा घालण्यास मदत होणार आहे. प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली. |
| i | आऊटसोर्स सर्व्हिसेस (Food, लॉन्ड्री, जैविक कचरा विल्हेवाट) | रु. ०२.८१ कोटी (शिखर समिती मान्यता रु. ०१.३१ कोटी) | या प्रस्तावावर चर्चा करताना, मा अध्यक्ष महोदयांनी पुढीलप्रमाणे सुचना दिल्या. सदर प्रस्तावामध्ये रुग्णालयांची स्वच्छता, बायोमेडीकल वेस्ट गोळा करणे व जेवणाची व्यवस्था करणे हे घटक भिन्न आहेत. अशा घटकांचे एकत्रीकरण करण्यात येऊ नये. कारण या विविध सुविधा पुरविणारे पुरवठादार भिन्न असून निविदा करतांना एकत्रीकरण होऊ नये. तसेच लंगर/ भंडारा/पंगत मध्ये देण्यात येणा-या अन्नाची गुणवत्ता देखील चांगली असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी एकदा इस्कॉन, बप्पा सिताराम व इतर अन्नपुरवठा करणा-या सेवाभावी संस्थांची एक संयुक्त बैठक घेऊन सर्वच यंत्रणांच्या भोजन व्यवस्थेच्या नियोजनामध्ये त्यांना समाविष्ट करुन घेणेबाबतच्या पर्यायावर विचार करणे योग्य होईल. उपरोक्त बाबी व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधीन राहून सर्वानुमते प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |

| अ. क्र | प्रस्तावाचे नाव | प्रस्तावाचा खर्च | बैठकीतील चर्चेचा सविस्तर तपशिल / निर्णय |
|---|---|---|---|
| j | इतर (Emergency Communication, Tracking & Patient Monitoring System, Training For Disaster Management) | रु. ०२.९५ कोटी (शिखर समिती मान्यता रु. ०१.९० कोटी) | सदर प्रस्तावाबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी यापुर्वीच्या बैठकीत सदर प्रस्तावाच्या उपयुक्ततेबाबत प्रश्न उपस्थित केल्याचे नमुद केले. तसेच प्रस्तावातील सर्व घटकांची माहिती घेऊन पुढीलप्रमाणे सुचना केल्या.<br>आवश्यक वैद्यकीय संगणक प्रणालींसह सुविधा देणारे टॅबलेट्स सध्या मार्केटमध्ये उपलब्ध आहेत त्या पर्यायांचा विचार प्राधान्याने करण्यात यावा. वॉकी टॉकींची संख्या आवश्यकतेप्रमाणे असल्याची खात्री करुनच खरेदी प्रक्रीया एकत्रीतपणे राबविणेच्या अटीवर मान्यता देण्यात आली.<br>तसेच मनुष्यबळ व्यवस्थापनाकरीता सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटच्या बाबीकरीता ही कुंभमेळा आयुक्त यांनी सर्वच विभागांची एकत्रीत बैठक घेऊन याबाबत निर्णय घ्यावा जेणेकरून कुंभमेळ्यात एकाच प्रकारच्या कामासाठी विविध software वापरले जाणार नाही.<br>उपरोक्त बाबी व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधीन राहून सर्वानुमते प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |

**विषय क्र. २:- जिल्हा शल्य चिकीत्सक- जिल्हा सामान्य रुग्णालय, नाशिक अंतर्गत आरोग्य विषयक कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

| अ. क्र | प्रस्तावाचे नाव | प्रस्तावाचा खर्च | बैठकीतील चर्चेचा सविस्तर तपशिल / निर्णय |
|---|---|---|---|
| a | तात्पुरत्या स्वरुपात चिकित्सालय व पोर्टा कॅबिन उभारणे | रु. २३.८१ कोटी (शिखर समिती मान्यता रु. २३.६३ कोटी) | त्र्यंबकेश्वर साधुग्राम येथे ५० खाटांचे फेब्रिकेशन रुग्णालय आणि इतर ठिकाणी ३१ पोर्टा हॉस्पिटल व १३ Site ICU उभारणे. उपरोक्त मनपा आरोग्य विभागाच्या चर्चेमधील अ.क्र. a मध्ये नमूद निर्देश व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधिन राहून सर्वानुमते प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
| b | आपत्ती अनुषंगाने वैद्यकीय सेवांचे सक्षमीकरण (Disaster Management) | रु. ०२.१५ कोटी | नव्याने तयार झालेल्या १०० खाटांच्या MCH विंग आणि महिला व बाल रुग्णालयासाठी अतिरिक्त वैद्यकीय उपकरणे व औषध खरेदीसाठी खर्चास उपरोक्त मनपा आरोग्य विभागाच्या चर्चेमधील अ.क्र. d, e मध्ये नमूद निर्देश व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधिन राहून सर्वानुमते प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
| c | आपत्कालीन स्थलांतर प्रणाली (रुग्णवाहिका उपलब्धता) | रु. १०.२४ कोटी (शिखर समिती मान्यता रु. ०६.६९ कोटी) | जिल्हा रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय त्र्यंबकेश्वरसाठी ९ ALS व १६ BLS रुग्णवाहिका खरेदी व ३० रुग्णवाहिका (१० ALS व २० BLS )भाडेतत्त्वावर घेण्यासाठी खर्चास उपरोक्त मनपा आरोग्य विभागाच्या चर्चेमधील अ.क्र. c मध्ये नमूद निर्देश व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधिन राहुन सर्वानुमते प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |

| अ. क्र | प्रस्तावाचे नाव | प्रस्तावाचा खर्च | बैठकीतील चर्चेचा सविस्तर तपशिल / निर्णय |
|---|---|---|---|
| d & e | औषधे आणि वैद्यकीय उपकरणे खरेदी | एकूण प्रस्ताव (शिखर समिती मर्यादा रु. २८.०७ कोटी अंतर्गत) | आवश्यक औषध साठा व सर्जिकल साहित्यासाठी रु. १९.५० कोटी आणि हॉस्पिटल बेड, मॉनिटर्स आदी उपकरणांसाठी रु. १९.४५ कोटी अशा एकूण प्रस्तावास- उपरोक्त मनपा आरोग्य विभागाच्या चर्चेमधील अ.क्र. d, e मध्ये नमूद निर्देश व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधिन राहुन सर्वानुमते प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
| f | भीष्म किट (BHISHMA Cubes) खरेदी | रु. ०२.६६ कोटी | कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, सदरचा प्रस्ताव हा अवर सचिव आपत्ती व्यवस्थापन यांचेकडुन प्राप्त पत्र क्र. १५३८९८१ दि.२३.०७.२०२६ नुसार हा केंद्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत दिल्या जाणा-या निधीतुन राज्यस्तरावरुन खरेदी करुन विभागास उपलब्ध करुन दिल्या जाणा-या खालीलप्रमाणे 3 प्रकारच्या साहित्यात समाविष्ट आहे. अ) Integrated Flood Management System ब) Specialised Fire-fighting with specialised equipment and tethered fire-fighting drone क) Modular Field Hospital with Triage and Trauma Response Unit सदरचा प्रस्ताव बैठकीत अवलोकनार्थ सादर केल्याचे नमूद केले. |
| g | कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करणे | रु. १४.१९ कोटी (शिखर समिती मान्यता रु. १४.०७ कोटी) | जिल्हा रुग्णालयाच्या अधीनस्त यंत्रणेसाठी ४ महिन्यांकरिता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर कर्मचारी भरतीसाठी खर्चास मनपा आरोग्य विभागाच्या चर्चेमधील अ.क्र. g मध्ये नमूद निर्देश व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधिन राहुन सर्वानुमते प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
| h | Existing Hospital Upgradation & Extension | एकूण रु. १२.३९ कोटी | त्र्यंबकेश्वर ५० बेड रुग्णालय साहित्य (रु. ३.३१ कोटी), लिनन खरेदी (रु. ०.७५ कोटी), रुग्णवाहिका इंधन (रु. २.४७ कोटी), स्टाफ निवास व भोजन (रु. २.५१ कोटी) आणि पोलीस कमिशनर रुग्णालय (रु. ३.३६ कोटी) पोलिस विभागाला स्वतंत्र हॉस्पिटलची आवश्यकता का आहे याची मा. अध्यक्ष महोदयांनी विचारणा केली. सदर बाबीची खात्री व उपयुक्तता तपासुनच पुढील प्रक्रीया राबवावी अशा सुचना केल्या. एकूण रक्कम रु. १२.३९ कोटीच्या प्रस्तावास मनपा आरोग्य विभागाच्या चर्चेमधील अ.क्र. b मध्ये नमूद निर्देश व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधिन राहून सर्वानुमते प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
| i | आऊटसोर्स सर्व्हिसेस (Cleaning & Bio-Medical Waste) | रु. ०१.८५ कोटी | धुलाई, स्वच्छता व जैववैद्यकीय कचरा विल्हेवाटीच्या खर्चास मनपा आरोग्य विभागाच्या चर्चेमधील नमूद निर्देश व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधिन राहुन सर्वानुमते प्रस्तावास मान्यता देण्यात आली. |
| j | इतर (Emergency Operation Center & ICCC) | एकूण रु. ०३.७२ कोटी | सॉफ्टवेअर, वॉकी-टॉकी, टॅब व एकात्मिक केंद्रीय कमांड कंट्रोल सेंटर (ICCC) च्या रु. ०२.७३ कोटी आणि मॅनपावर प्रशिक्षणाच्या रु. ०.९९ कोटी अशा एकूण खर्चाच्या प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मा. अध्यक्ष महोदयांनी प्राधिकरणाच्या वतीने स्मार्ट सिटी कार्यालय येथे स्थापित ICCC मध्ये आवश्यक सुविधा व बसण्याची व्यवस्था करुन दिल्यास योग्य होईल. प्रत्येक विभागासाठी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वेगळी व्यवस्था निर्माण न करता याबाबत कुंभमेळा आयुक्त यांनी पोलिस विभाग, आरोग्य विभाग, जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर विभागांच्या आवश्यकतेनुसार सर्वांच्या गरजांचा आढावा घेऊन आवश्यक सुविधा ICCC मध्ये उपलब्ध करुन दिल्यास संयुक्तीक होईल असे मत मा. अध्यक्ष महोदयांनी व्यक्त केले. तथापि, आवश्यकतेनुसार प्रस्ताव फेरसादर करावा, असे सूचित केले. |

**विषय क्र. ३:- आरोग्य विभाग, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत विविध कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

| अ. क्र | प्रस्तावाचे नाव | प्रस्तावाचा खर्च | बैठकीतील चर्चेचा सविस्तर तपशिल / निर्णय |
|---|---|---|---|
| a | तात्पुरती पोर्टा कॅबिन चिकित्सालये (OPD + ३ Bed) उभारणे | रु. ०८.१७ कोटी (शिखर समिती मान्यता रु. ०५.२५ कोटी) | वाहनतळांच्या ठिकाणी ३७ तात्पुरती पोर्टा कॅबिन चिकित्सालये उभारण्यासाठी खर्चास मनपा आरोग्य विभागाच्या चर्चेमधील अ.क्र. a मध्ये नमूद निर्देश व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधिन राहुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| b | आपत्कालीन स्थलांतर प्रणाली (रुग्णवाहिका उपलब्धता) | रु. ०९.२२ कोटी (शिखर समिती मान्यता रु. ०६.५४ कोटी) | जि.प. कार्यक्षेत्रासाठी ३७ BLS रुग्णवाहिका खरेदीच्या खर्चाच्या प्रस्तावास मनपा आरोग्य विभागाच्या चर्चेमधील अ.क्र. c मध्ये नमूद निर्देश व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधिन राहुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| c & d | औषधी किट व वैद्यकीय उपकरणे पुरवठा | औषधी: रु. ०६.४७ कोटी (शिखर समिती मान्यता रु. ०४.५७ कोटी) उपकरणे: रु. ०२.०५ कोटी | औषधी किट पुरवठ्यासाठी आणि वैद्यकीय उपकरणांसाठीच्या खर्चास मनपा आरोग्य विभागाच्या चर्चेमधील अ.क्र. d व e मध्ये नमूद निर्देश व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधिन राहुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| e | कंत्राटी मनुष्यबळ, | रु. ०८.१० कोटी | मनपा आरोग्य विभागाच्या चर्चेमधील अ.क्र. g, h व i मध्ये नमूद निर्देश व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या व बैठकीत दिलेल्या सर्व सुचनांच्या अधिन राहुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| f | डास प्रतिबंधक उपाययोजना | रु. ०१.७८ कोटी | |
| g | निवास/भोजन | रु. ०१.२९ कोटी | |
| h | सॉफ्टवेअर प्रणाली | रु. ०१.८९ कोटी | सदर प्रस्तावाबाबत सर्व विभागांची बैठक घेऊन एकत्रिकरण करुन प्रणाली विकसीत करण्याबाबत सुचना दिल्या. |

वरीलपैकी विषय क्र. 1 ते 3 पैकी बऱ्याच बाबींची पूर्तता C.S.R. मार्फत शक्य आहे. त्याची नीट चाचपणी करावी आणि त्यात वरील बाबी उपलब्ध झाल्यास त्या C.S.R. मार्फत घेऊन आवश्यकतेनुसार शासनामार्फत कमी खरेदी करावी.

**मा. अध्यक्ष महोदयांनी आरोग्यविषयक बाबींकरीता दिलेल्या सर्वसाधारण सुचना-**

- सर्व खरेदी प्रस्तावांचे वर्गीकरण, एकत्रीकरण करण्याकरीता आवश्यकतेनुसार उपसंचालक, आरोग्य विभाग यांचेस्तरावर तांत्रिक समिती स्थापित करण्यात यावी.
- सदर समितीमध्ये आरोग्यविभागाचे सर्व विभागप्रमुख, आवश्यकतेप्रमाणे तज्ञ व्यक्ती व नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाकडील एक अधिकारी सदस्य म्हणुन समितीमध्ये असावेत अशा सुचना करण्यात आल्या.
- समितीने या बैठकीत मंजुर झालेल्या प्रकल्पांचे आवश्यकतेनुसार व व्यवहार्यता विचारात घेऊन प्रस्तावांचे एकत्रीकरण, वर्गीकरण करुन पुढील कार्यवाही करावी.
- पुरविण्यात येणा-या साहित्याचा/ औषधांचा/ यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीचा दर्जा, गुणवत्ता, उपलब्धता व वापर यांचा विचार करुनच वर्गीकरण अथवा एकत्रीकरण करुनच खरेदी प्रक्रीया राबवावी.
- कुंभमेळा आयुक्त यांनी मनुष्यबळ पुरवठ्याशी आणि व्यवस्थापनाशी संबंधित सर्व विभागांची (उदाहरणार्थ :-आरोग्य, इतर विभाग) एकत्रित बैठक घेऊन एकत्रित प्रणाली विकसीत करण्याच्या पर्यायाचा विचार करावा.

**विषय क्र. ४:- नाशिक शहर पोलीस यंत्रणेचे बळकटीकरण.**

- **नाशिक शहर पोलीस:-**

  मा. अध्यक्षांनी यापूर्वीच्या दि. १७/०२/२०२६ च्या बैठकीतील चर्चेबाबत विचारले असता, कुंभमेळा आयुक्त यांनी माहिती दिली की, दि. १७.०२.२०२६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीतील ज्या विषयांना त्यावेळी तांत्रिक मान्यता नसल्यामुळे प्रस्ताव परत सादर करण्याच्या सुचना होत्या. त्यानुसार सदरचे प्रस्ताव परत प्रस्तावित करण्यात आले आहेत. तरी याद्वारे विनंती करण्यात येते की, शिखर समितीने मान्यता दिलेल्या एकूण रक्कमेच्या अधिन राहुन प्रस्तावांमधील अंतर्गत व्यवहार्य बदलांसह प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले आहेत.

| अ.क्र | कामाचा तपशिल | प्रस्तावित रक्कम | शिखर समिती मान्यता रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मंगल कार्यालय/ लॉन्स, लॉज, धर्मशाळा भाडयाने घेणे- ( रु.५२,२६,८२,००० पैकी बयाना २० टक्के अग्रीम देणेकरीता १०.४५ कोटी रक्कम प्राप्त ) | रु. ४१.८१८२ कोटी | रु. ४१.८१८२ कोटी |
| २ | Emerangency Managment and Manpowar Training | रु. ३३.४६ कोटी | रु. ३३.४६ कोटी |
| ३ | कंटेनर पोलीस चौकी कॅम्प +स्टे | रु.३.५३४३ कोटी | रु.३.५३४३ कोटी |
| ४ | बीडीडीडीएस | रु.११.६०२०४०७ कोटी | रु.११.६०२०४०७ कोटी |
| ५ | वॉच टॉवर | रु.२.५० कोटी | रु.२.५० कोटी |
| ६ | आपत्ती व्यवस्थापन साधनसामग्री | रु.६.०० कोटी | रु.६.०० कोटी |
| ७ | बॅरीकेटींग<br>बल्ली बॅरीकेटींग | रु.१२.१५ कोटी | रु.१२.१५ कोटी |
| ८ | स्टिल बॅरीकेटींग | रु.१२.५० कोटी | रु.१२.५० कोटी |
| ९ | मोझो बॅरीकेटींग | रु.३.०० कोटी | रु.३.०० कोटी |
| १० | बिनतारी संदेश यंत्रणा | रु.२६.४०४७९८९ कोटी | रु.२६.४०४७९८९ कोटी |
| ११ | वाहन खरेदी | रु.१५.३५८१४२७ कोटी | रु.१५.३५८१४२७ कोटी |

शिखर समितीने दिलेल्या मान्यतेच्या अधिन राहून उपरोक्तनुसार प्रस्तावांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

बैठक-इतिवृत्त

**विषय क्र. ५:- नाशिक ग्रामीण पोलीस यंत्रणेचे बळकटीकरण.**

पोलिस अधिक्षक, नाशिक ग्रामीण यांचेकडील एकूण १६ प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर केले.

| अ.क्र | कामाचा तपशिल | प्रस्तावित रक्कम | शिखर समिती मान्यता रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निवासव्यवस्था दुरुस्ती ५ बॅरेक व पोलीस मुख्यालय आडगांव येथे १ रेस्ट हाऊस (४ रुमचा) | रु.४.५११८०३२ कोटी | रु. ३.३० कोटी (शिखर समितीची मान्यता रक्कम रु.९१.६० कोटी असून दि.१७.२.२६ चे बैठकीतील अ.क्र.१ व २ चे रु.८८.३० मंजुर केले होते. त्या रकमेमधील शिल्लक वाव) |
| २ | १ रेस्ट हाऊस नविन बांधकाम | रु.०.७२२८५०० कोटी | |
| ३ | व्ही.आय.पी. मुव्हमेंट, कायदा व सुव्यवस्था, गर्दी नियंत्रण व सुरक्षेसाठी 290 नवीन वाहने खरेदी आवश्यक आहे. | रु. १९.४८०४६४३ कोटी | रु. १२.९१ कोटी |
| ४ | तात्पुरते वॉच टॉवर (20) | रु.१.७०९५ कोटी | रु. १.२० कोटी |
| ५ | वॉटर बॅरिकेटिंग | रु.१४.३६७० कोटी | रु. २.५० कोटी |
| ६ | स्टील रेलिंग बॅरिकेटिंग (बल्ली बॅरिकेटिंग ऐवजी) | रु.३२.०४८९ कोटी | रु. २.७० कोटी |
| ७ | स्मार्ट टेक्नॉलॉजीचा वापर (स्मार्ट तंत्रज्ञान व ॲप्स) | रु.०३.०० कोटी | रु. २.०० कोटी |
| ८ | सोशल मीडिया लॅब | रु.०७.०० कोटी | रु. ३.६० कोटी |
| ९ | २५० आसन क्षमतेचा प्रशिक्षण हॉल | रु.७.४९९५ कोटी | रु. ४.०० कोटी |
| १० | कार्यालयीन खर्च | रु. ०५.०० कोटी | रु. ५.०० कोटी |
| ११ | विशेष पोलीस महानिरिक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालयाच्या मोकळया जागेत डोमशेड बांधणे | रु.१.७७८५ कोटी | रु. १.७८ कोटी |
| १२ | विशेष पोलीस महानिरिक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे कार्यालय येथील कॉन्फरन्स हॉलचे नुतनीकरण | रु. ०.४९७२४१९ कोटी | रु. ०.५० कोटी |
| | **आपत्ती व्यवस्थापन सामग्री उपलब्ध करण्योच प्रस्ताव पुढीलप्रमाणे** | | |
| १३ | बिनतारी संदेश 107 उपकरणे | रु.१०.५९६४३०० कोटी | रु. १०.६० कोटी |
| १४ | बी.डी.डी.एस. 36 उपकरणे | रु.१६.४२२६४०० कोटी | रु. १३.०८ कोटी |
| १५ | ईमरजन्सी मॅनेजमेंट आणि मॅनपावर | रु. १२.५४३३७०० कोटी | रु. ७.०० कोटी |
| १६ | प्रशिक्षण | रु. २६.८१८० कोटी | रु. ५.०० कोटी |

बैठक इतिवृत्त

**पोलीस विभागाच्या प्रस्तावांच्या सादरीकरणावेळी झालेली चर्चा व निर्णय-**

- तसेच सभेच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, मंजुर कामांच्या निविदा प्रक्रीयांबाबत गृह विभागाकडून मा. पोलीस आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय खरेदी समितीला एकूण खरेदीमुल्य रक्कम रु. ३५.००

लक्षच्या व पोलीस अधीक्षक यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय खरेदी समितीला एकूण खरेदीमुल्य रक्कम रु.२०.०० लक्षच्या मर्यादा आहेत. तरी याबाबत मार्गदर्शन मागविण्यात आले असता यापुर्वी प्रशासकीय मान्यता झालेल्या कामांपैकी, साहित्य खरेदीच्या प्रस्तावांची खरेदी शासन स्तरावरुन व मनुष्यबळ व्यवस्थापनाशी संबंधित सेवाविषयक बाबींची खरेदी जिल्हास्तरावरुन करणेबाबत सुचना प्राप्त झाल्याचे पोलीस अधिक्षक यांनी सांगीतले.

- आडगाव मुख्यालय येथे पोलीस बॅरेक्स, विश्रामगृह व २५० आसन क्षमतेचा प्रशिक्षण हॉल बांधणे, तसेच इतर बांधकाम विषयक कामांबाबत सविस्तर चर्चा करुन पुढील निर्णय घेण्याबाबत मा. अध्यक्ष महोदयांनी खालीलप्रमाणे सुचना दिल्या-
  - तसेच उपलब्ध सुविधांसाठी इतर उपलब्ध पर्यायांची तपासणी करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. तसेच बांधकामाची प्रस्तावित केलेली कामे ही कुंभमेळा २०२७ च्या अनुषंगाने तातडीने मार्च २०२७ पुर्वी पुर्ण करुन घेणे शक्य असल्याची खातरजमा करावी.
  - तसेच विशेष पोलीस महानिरिक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे कार्यालय येथील कॉन्फरन्स हॉलचे नुतनीकरणाच्या व कार्यालयाच्या मोकळ्या जागेतील डोमशेड बांधकामाच्या, 250 आसन क्षमता असणा-या प्रशिक्षण हॉलच्या प्रस्तावाबाबत विशेष पोलीस महानिरिक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक यांनी व पोलिस अधिक्षक, नाशिक ग्रामीण यांनी आवश्यकतेची पुन:श्च खातरजमा करावी अशा सुचना देण्यात आल्या.
- तसेच मा. अध्यक्ष महोदयांनी कार्यालयीन खर्चाकरिता नमूद रक्कम रु. ५.०० कोटींच्या आवश्यकतेची खात्री पोलिस विभागाने करणे आवश्यक असल्याची बाब नमूद केली.
- तसेच प्रस्तावित वाहनांच्या आवश्यकतेची खातरजमा करुनच आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी अशाही सुचना देण्यात आल्या.

उपरोक्त बाबींची पुर्तता करुनच शिखर समितीच्या मान्यतेच्या अधिन राहुन प्रस्तावित (अ.क्र.1,2,3,4,5, 6,13,14,15,16) कामांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच उर्वरीत प्रस्तावांबाबत दिलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करुन पुढील बैठकीत प्रस्ताव आवश्यकतेनुसार सादर करण्याच्या सुचना दिल्या.

सोशल मिडीया लॅब व स्मार्ट टेक्नॉलॉजीचा वापर (स्मार्ट तंत्रज्ञान व ॲप्स) , ICCC च्या आवश्यकतेबाबत यंत्रणांच्या मागणीनुसार सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत कुंभमेळा आयुक्त यांनी सर्व विभागांची संयुक्त बैठक घेऊन एकत्रित यंत्रणा विकसीत करण्याच्या पर्यायाबाबत विचार करुन सविस्तर सादरीकरण तयार करुन मान्यतेस्तव सादर करावे अशा सुचना दिल्या.

---

- **विषय क्र. ६- सिंहस्थ कुंभमेळाचे अनुषंगाने विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात वैद्यकिय उपकरणे व अनुषंगिक साहित्य उपलब्ध करुन देणे-**
  - नवीन १०५ खाटांच्या इमारतीमध्ये प्लास्टिक, न्यूरो व पेडियाट्रिक सर्जरी विभाग सुरू करण्यासाठी **रु. ०६.०१ कोटी** खर्चाची वैद्यकीय उपकरणे खरेदी .
  - प्रस्तावित कामाची आवश्यकता विचारात घेऊन सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतरच सदर कामाला प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात यावेत. सदर कामाकरीता शिखर समितीने मान्यता दिलेल्या कुंभमेळा योजनेत तरतूद करण्यात आलेली नाही त्यामुळे कुंभमेळा शिखर समितीच्या मान्यतेनंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित करण्यात यावेत या अटीवर सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

- **विषय क्र. ७- नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळयाच्या अनुषंगाने शिर्डी नगरपरिषदेने सादर केलेल्या टप्पा -२ च्या प्रस्तावानुसार रस्ते व वाहनतळाचे काम**
    - शिर्डी शहरात श्री साईबाबा दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या गर्दी नियंत्रणासाठी रस्ते व वाहनतळ कॉंक्रिटीकरण करणे (**रु. ३४.५१ कोटी**)
    - प्रस्तावित कामाची आवश्यकता विचारात घेऊन सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतरच सदर कामाला प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात यावेत. सदर कामाकरीता शिखर समितीने मान्यता दिलेल्या कुंभमेळा योजनेत तरतूद करण्यात आलेली नाही त्यामुळे कुंभमेळा शिखर समितीच्या मान्यतेनंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित करण्यात यावेत या अटीवर सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.
    -

- **विषय क्र. ८- कुंभमेळा निधी अंतर्गत शिर्डी शहरात उत्तर व दक्षिण दिशेने प्रवेश करते वेळी नगर-मनमाड हायवेवर "कुंभमेळा/हेरीटेज स्वागत कमानी" उभारणे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता**
    - नगर-मनमाड हायवेवर उत्तर व दक्षिण दिशेला "कुंभमेळा स्वागत कमानी" उभारण्याच्या सुधारित रु. ०७.८८ कोटी .
    - प्रस्तावित कामाची आवश्यकता विचारात घेऊन सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतरच सदर कामाला प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात यावेत. सदर कामाकरीता शिखर समितीने मान्यता दिलेल्या कुंभमेळा योजनेत तरतूद करण्यात आलेली नाही त्यामुळे कुंभमेळा शिखर समितीच्या मान्यतेनंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) निर्गमित करण्यात यावेत या अटीवर सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.
    -

- **विषय क्र. ९- शिंगणापुरला जोडणा-या रामा-६६ ते शनी शिंगणापूर (ग्रा.मा २४७) कि.मी. २.००, शनी शिंगणापूर ते कांगोनी (ग्रा.मा-१२८) कि.मी.३.९५० ची सुधारणा करणे ता. नेवासा, जि. अहिल्यानगर या रस्त्याचे काम.**
    - शनि शिंगणापूर व नेवासा परिसरातील वाहतूक सुलभतेसाठी रामा-६६ ते शनी शिंगणापूर रस्ता सुधारणा (**रु. ०७.८४ कोटी**)
    - प्रस्तावित कामाची आवश्यकता विचारात घेऊन सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतरच सदर कामाला प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात यावेत. सदर कामाकरीता शिखर समितीने मान्यता दिलेल्या कुंभमेळा योजनेत तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे कुंभमेळा शिखर समितीच्या मान्यतेनंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) निर्गमित करण्यात यावेत या अटीवर सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.
    -

- **विषय क्र. १०- सोनई घोडेगाव कुकाणा रस्ता रामा-६६ किमी ३४/८०० ते ४२/८०० ची सुधारणा करणे व किमी ४१/०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे, ता नेवासा, जि. अहिल्यानगर या रस्त्याचे काम.**
    - सोनई घोडेगाव कुकाणा रस्ता व लहान पूल बांधकाम (**रु. १३.९६ कोटी**)
    - प्रस्तावित कामाची आवश्यकता विचारात घेऊन सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतरच सदर कामाला प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात यावेत. सदर कामाकरीता शिखर समितीने मान्यता दिलेल्या कुंभमेळा योजनेत तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे कुंभमेळा शिखर समितीच्या मान्यतेनंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) निर्गमित करण्यात यावेत या अटीवर सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

NTKMA बैठक- इतिवृत्त

- **विषय क्र. ११- सोनई-कांगोनी ते अहिल्यानगर संभाजी नगर रस्ता कि.मी.१०/०० ते १८/५०० (प्र.जि. मा. १८९) ची सुधारणा करणे व प्र.जि.मा १८९ ते गट क्र.८०९ सोनई पर्यंत रस्ता (पाटबंधारे कालवा मार्ग) १.४० कि.मी. ता नेवासा, जि. अहिल्यानगर या रस्त्याचे काम.**
    - सोनई-कांगोनी रस्ता मजबुतीकरण (**रु. २१.९७ कोटी**)
    - प्रस्तावित कामाची आवश्यकता विचारात घेऊन सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतरच सदर कामाला प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात यावेत. सदर कामाकरीता शिखर समितीने मान्यता दिलेल्या कुंभमेळा योजनेत तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे कुंभमेळा शिखर समितीच्या मान्यतेनंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) निर्गमित करण्यात यावेत या अटीवर सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.
    -

- **विषय क्र. १२- कांगोनी-खरवंडी रस्ता कि.मी.०/०० ते ३/८५० इ.जि.मा.३२३ व खरवंडी-वडाळा बहिरोबा रस्ता कि.मी.३०/४५० ते ३३/१५० प्र.जि.मा.३२ ची सुधारणा करणे या रस्त्याचे काम**
    - कांगोनी-खरवंडी रस्ता सुधारणा (**रु. १५.६३ कोटी**)
    - प्रस्तावित कामाची आवश्यकता विचारात घेऊन सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतरच सदर कामाला प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात यावेत. सदर कामाकरीता शिखर समितीने मान्यता दिलेल्या कुंभमेळा योजनेत तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे कुंभमेळा शिखर समितीच्या मान्यतेनंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) निर्गमित करण्यात यावेत या अटीवर सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.
    -

- **विषय क्र. १३- त्र्यंबकेश्वर येथील श्री. क्षेत्र त्र्यंबकेश्वर उपसा प्रणाली योजनेसाठी सौर उर्जा प्रकल्प उभारणे**
    - गोदावरी नदी प्रवाहित ठेवण्यासाठी प्रगतीपथावर असलेल्या 'श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर उपसा प्रणाली योजनेसाठी' २ MW क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यास **रु. २४.५५ कोटी** .
    - प्रस्तावित कामाची आवश्यकता विचारात घेऊन सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतरच सदर कामाला प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात यावेत. सदर कामाकरीता शिखर समितीने मान्यता दिलेल्या कुंभमेळा योजनेत तरतूद करण्यात आलेली नाही त्यामुळे कुंभमेळा शिखर समितीच्या मान्यतेनंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) निर्गमित करण्यात यावेत या अटीवर सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

- **विषय क्र. १४- गंगापुर रोडवरील महात्मा नगर ते मोतीवाला कॉलेज उजवा तट कालवा रत्यावरील विद्युत वाहिनी स्थलांतरीत करणे (नाशिक मनपा):**
    - गंगापूर रोडवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महात्मा नगर ते मोतीवाला कॉलेज उजवा तट कालवा रस्त्यावरील विद्युत वाहिनी स्थलांतरित करण्यास **रु. ०९.०० कोटी** .
    - प्रस्तावित कामाची आवश्यकता विचारात घेऊन सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतरच सदर कामाला प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात यावेत. सदर कामाकरीता शिखर समितीने मान्यता दिलेल्या कुंभमेळा योजनेत तरतूद करण्यात आलेली नाही त्यामुळे कुंभमेळा शिखर समितीच्या मान्यतेनंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) निर्गमित करण्यात यावेत या अटीवर सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

बैठक इतिवृत्त

- **विषय क्र. १५- कुंभमेळा काळात रहदारी नियंत्रणासाठी आवश्यक रामवाडी ते घारपुते घाट पुलाचे काम**
  - पंचवटी व शहराला जोडणाऱ्या आणि सिंहस्थ काळात रहदारी नियंत्रणासाठी अत्यंत आवश्यक अशा 'रामवाडी ते घारपुरे घाट' दरम्यान गोदावरी नदीवर नवीन पूल बांधण्यासाठी **रु. २६.०० कोटी** व भूसंपादनासाठी **रु. १५.०० कोटी** अशा एकूण **रु. ४१.०० कोटीचा** प्रकल्प.
  - प्रस्तावित कामाची आवश्यकता विचारात घेऊन सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतरच सदर कामाला प्रशासकीय मान्यता आदेश निर्गमित करण्यात यावेत. सदर कामाकरीता शिखर समितीने मान्यता दिलेल्या कुंभमेळा योजनेत तरतूद करण्यात आलेली नाही त्यामुळे कुंभमेळा शिखर समितीच्या मान्यतेनंतरच कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) निर्गमित करण्यात यावेत या अटीवर सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.

**आयत्या वेळचे विषय ज्यावर चर्चा व निर्णय घेण्यात आले :-**

१. **गणेशोत्सवामध्ये नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या वतीने गणेश मंडळांच्या देखाव्यांकरीता स्पर्धा आयोजित करणे.- रक्कम रु. १०.०० लक्ष सदर** या कामाची निकड व शिल्लक कमी वेळ यामुळे सदर प्रस्तावाला मान्यता देणेची आवश्यकता असल्याचे कुंभमेळा आयुक्तांनी नमूद केले. सदर कामाची व्दिरुक्ती होणार नाही याची खात्री करुन तसेच उपरोक्त दिलेल्या सुचनांच्या अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

२. **कुंभमेळा-२०२७ च्या अनुषंगाने डाक विभागामार्फत My Stamp तयार करण्याकरीता व त्याच्या अनावरणाकरीता आवश्यक प्रशासकीय खर्चास मान्यता देणे- रक्कम रु. ३०.०० लक्ष** कुंभमेळा आयुक्तांनी नमूद केले की, या कामाकरीता डाक विभागाकडुन सविस्तर प्रस्ताव घेऊन कुंभमेळा २०२७ चे स्टॅम्प तयार करणेबाबत नियोजन करण्यात आले असून ध्वजारोहण कार्यक्रमाप्रसंगी स्टॅम्पच्या अनावरणाचे नियोजन करण्यात आले आहे. उपरोक्त दिलेल्या सुचनांच्या अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**३.** श्रावण महिण्यात नाशिक जिल्हयातील व आसपासच्या तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी येणाऱ्या यात्रेकरुंचे प्रश्नावली सर्वेक्षण करणे (किमान 4800 नमुने) या कामाची आवश्यकता असल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगीतले. नाशिक त्र्यंबकेश्वर महासिंहस्थ कुंभमेळा- २०२७ च्या अनुषंगाने यात्रेकरुंच्या अपेक्षा, प्राधिकरणाच्या तयारीविषयी त्यांची मते जाणुन घेऊन विश्लेषणात्मक अभ्यासाकरीता व पुढील नियोजनाकरीता याचा फायदा होणार असल्याचे नमूद केले. सदर कामाकरीता रक्कम रु. ५.४७ लक्षची आवश्यकता असल्याचे व कामाची निकड लक्षात घेऊन सर्व्हेक्षणाचे काम पहिल्या श्रावणी सोमवारपासुन त्र्यंबकेश्वर येथुन सुरु करण्यात आले असुन सदर कामाला कार्योत्तर मंजुरी आवश्यक असल्याची बाब निदर्शनास आणून दिली.

---

**अध्यक्ष महोदयांनी बैठकीदरम्यान दिलेल्या महत्वपुर्ण सूचना:-**

- **शिखर समितीची मान्यता अनिवार्य:-** ज्या विषयांना अद्याप शिखर समितीची मंजुरी नाही, अशा सर्व प्रस्तावांची मान्यता त्वरित प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. शिखर समितीच्या अंतिम मान्यतेशिवाय कोणत्याही कामाचे कार्यरंभ आदेश (Work Order) किंवा पुरवठा आदेश (Supply Order) निर्गमित केले जाऊ नयेत.
- कुंभमेळा योजनेत समाविष्ट करावयाची कामे ही मार्च २०२७ म्हणजेच कुंभमेळा सुरु होण्यापुर्वी पुर्ण होणे शक्य असल्यासच प्रस्तावित करण्यात यावीत. तसेच कुंभमेळा योजनेच्या वित्तीय आकारमानात झालेली वाढ विचारात घेऊन यापुढे प्रस्तावांमध्ये कपात करणे अनिवार्य असल्याच्या सुचना दिल्या.

- कामांची आवश्यकता व कुंभमेळा २०२७ करीताची उपयुक्तता याच आधारावर कामांचा समावेश करण्यात यावा.
- प्राधिकरणाच्या बैठकीत प्रस्तावित विषयांवर आवश्यक तपासणी, विचारविनिमय करण्याकरीता पुरेसा वेळ मिळाणेकरीता यंत्रणांनी त्यांचेकडील कुंभमेळाविषयक भविष्यात प्रस्तावित करावयाचे सर्व प्रस्ताव दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ पुर्वी सादर करावेत. तसेच प्रस्तावांचे तुकडीकरण करुन सादर न करता सर्व विभागांनी आपला सर्वंकश आराखडा सादर करणे अनिवार्य आहे. तशा सुचना कुंभमेळा आयुक्त यांनी यंत्रणांना पत्राद्वारे कळवाव्यात.
- आयत्या वेळचे विषय चर्चेसाठी आणल्यास प्राधिकरणाच्या सदस्यांना त्याचा अभ्यास करणे शक्य होत नाही. तसेच प्राधिकरणाच्या कार्यामधील छाननीदेखील करणे शक्य होत नाही. त्यामुळे विशेषत: मोठ्या रकमेचे विषय आयत्या वेळी सादर करण्याचे टाळावे.

कुंभमेळा आयुक्त यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त करण्यात आली.

Digitally signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 07-09-2026 00:25:00

**(डॉ. प्रवीण गेडाम)**
**अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा**
**विभागीय आयुक्त, नाशिक**

बैठक- इतिवृत्त

# दि.२५.०८.२०२६ रोजीचे बैठकीस उपस्थितांची यादी

| | |
|---|---|
| १ | मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक |
| २ | मा.विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांचे प्रतिनिधी |
| ३ | पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचे प्रतिनिधी |
| ४ | महानगरआयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे प्रतिनिधी |
| ५ | आयुक्त, महानगरपालिका, नाशिक. (VC व्दारे) |
| ६ | जिल्हाधिकारी, आहिल्यानगर यांचे प्रतिनिधी (VC व्दारे) |
| ७ | पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण. |
| ८ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.(VC व्दारे) |
| ९ | मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक. |
| १० | मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक |
| ११ | अधीक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.(VC व्दारे) |
| १२ | अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.(VC व्दारे) |
| १३ | सहाआयुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय |
| १४ | विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक |
| १५ | सह संचालक,लेखा व कोषागार विभाग, नाशिक |
| १६ | कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक |
| १७ | सह संचालक, नगर रचना विभाग, नाशिक (VC व्दारे) |
| १८ | मुख्याधिकारी त्र्यंबक नगरपरिषद |
| १९ | मुख्याधिकारी शिर्डी नगरपरिषद (VC व्दारे) |
| २० | मा.कुंभमेळा आयुक्त, (VC व्दारे) |
| २१ | व इतर अधिकारी |